Beed | DAILY | MARATHI | Year-03 | Issue -312 | TUESDAY DT.13 FEBRUARY 2024 | RNI-MAHMAR/2021/80074 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4

बीड | दैनिक | मराठी | वर्ष -०३ | अंक -३१२ | मंगळवार,दि.१३ फेब्रुवारी २०२४ | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२१/८००७४ | । किंमत ३ रू | । पाने ४




दैनिक • महाराष्ट्राचा बुलंद आवाज | बीड | छत्रपती संभाजीनगर | जालना | लातूर | परभणी | धाराशिव | हिंगोली | नांदेड | नगर

# मराठवाडा पत्र

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे




• बीड • dailymarathwadapatra2021@gmail.com • https://marathwadapatra.com • https://epaper.marathwadapatra.com • Mo. 9822152955

## निर्णय होईपर्यंत माघार नाही - मनोज जरांगे पाटील

प्रतिनिधी बीड



'मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आरक्षणाचा गुलाल अंगावर घेतला आहे. त्याचा अपमान होऊ देऊ नका. सरकारने अधिसूचना, मसुदा, 'सगेसोयरे' आदी निर्णयांची १५ फेब्रुवारीपर्यंत अंमलबजावणी करावी अन्यथा बेमुदत उपोषण मागे घेणार नाही, असा इशारा मनोज जरांगे यांनी सोमवारी अंतरवाली सराटी (ता. अंबड) येथे दिला.

जरांगे यांनी गेल्या शनिवारपासून (ता.१०) उपोषण सुरू केले आहे. आज उपोषणाचा तिसरा दिवस होता. अन्न, पाणी व वैद्यकीय उपचारांना त्यांनी नकार दिला आहे. अशक्तपणामुळे त्यांना उठता-बसता येत नाही. तरही ते उपोषणावर ठाम आहेत.

करावी या मागणीसाठी बुधवारी (ता.१४) महाराष्ट्र 'बंद'ची हाकही समाजाने दिली आहे. ''मी समाजाच्या पुढे जाणार नाही. घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी समाजाने शांततेत करावी.

## मराठा आरक्षण, विशेष अधिवेशन रविवारी शक्य

प्रतिनिधी बीड

मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण देण्याच्या मागणीवर अद्याप राज्यातील महायुतीमध्ये एकमत होताना दिसून येत नाही. या मागणीस छगन भुजबळ यांनी थेट विरोध दर्शवला असून ओबीसींना एकत्र करून राज्यात मराठा आरक्षणाविरोधात लढा उभारण्याची सुरुवात केली आहे.शिवाय, भाजपकडूनसुद्धा असहमती आहे. मात्र, दुसरीकडे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काढलेल्या अधिसूचनेचे कायद्यात रूपांतर करण्यासाठी ते स्वत: आग्रही आहेत. त्यासाठी येत्या १८ फेब्रुवारी रोजी विशेष अधिवेशन घेण्याचा प्रस्ताव येत्या कॅबिनेट बैठकीत येणार असल्याचे सूत्रांनी सांगितले आहे.




त्या दृष्टीने विधिमंडळ प्रशासन अलर्ट मोडवर आहे.कॅबिनेट बैठकीत प्रस्ताव मांडल्यानंतर एकमताने त्याला मंजुरी मिळाल्यास राज्यपालांकडे अंतिम मंजुरीसाठी जाणार आहे. त्यानंतर राज्यपालांनी विधिमंडळाला सूचना दिल्यावरच विशेष अधिवेशनाचा मार्ग मोकळा होईल.

## अशोक चव्हाणांचा आमदारकीचाही राजीनामा

### नाराजी नानांवर, धास्ती आदर्श घोटाळ्याची म्हणून अशोकरावांनी धरला भाजपचा मार्ग

प्रतिनिधी मुंबई

माजी मंत्री मिलिंद देवरा, बाबा सिद्दिकी यांच्यानंतर माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनीही काँग्रेसची साथ सोडली. त्यामुळे लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर पक्षाला मोठा धक्का बसला. सोमवारी सकाळीच चव्हाणांनी प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्याकडे काँग्रेसच्या सर्व पदांचा व विधानसभा अध्यक्षांकडे भोकरच्या आमदारकीचा राजीनामा सुपूर्द केला. चव्हाणांसोबत काँग्रेस प्रदेश उपाध्यक्ष अमरनाथ राजूरकर यांनीही पक्षाचा राजीनामा दिला आहे. विशेष म्हणजे महाविकास आघाडीच्या जागावाटपाबाबत चर्चा करण्यासाठी काँग्रेसचे प्रभारी रमेश चेन्नीथला यांनी मुंबईत ज्या



बैठका घेतल्या त्यात रविवारपर्यंत अशोक चव्हाण सहभागी होते त्यामुळे आश्चर्य व्यक्त होत आहे.

१५ ते १८ आमदार सोडणार टप्प्याटप्प्याने काँग्रेसची साथअशोक चव्हाण यांच्यासोबत काँग्रेसचे १५ ते१८ आमदार विधानसभा निवडणुकीपर्यंत पक्षाला सोडचिठ्ठी देतील अशी रणनीती आहे. काँग्रेसच्या या बंडाची सुरुवात विधानसभा अध्यक्षांच्या विश्वासदर्शक ठरावावेळी ४ जुलै २०२२ रोजी दिसली. त्या वेळी काँग्रेसचे काही आमदार जाणीवपूर्वक मतदानाला गैरहजर राहिले. देवेंद्र फडणवीस यांनी त्यांचे जाहीर आभारही मानले होते. महाराष्ट्र विधानसभेचा कार्यकाळ अजून ८ महिने आहे. तोपर्यंत आमदारकीत अडचण नको म्हणून हे चव्हाण समर्थक पक्षातच राहतील. मात्र विधानसभा निवडणुकीचे पडघम वाजू लागताच ते चव्हाणांच्या मार्गाने भाजपकडे मार्गस्थ होतील, अशी शक्यता दिसत आहे. हे बंड रोखण्यासाठी काँग्रेस प्रभारींनी मंगळवारी सर्व आमदारांची मुंबईत बैठक बोलावली आहे.

## माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण आजच भाजपमध्ये प्रवेश करणार

### श्रीक्षेत्र नारायणगडाच्या पायथ्याशी पंकजाताई मुंडे यांचं जोरदार स्वागत

## तुमचं दुःख हे माझं दुःख ; तुमच्या सुखासाठी आयुष्यभर लढत राहील

बीड ।प्रतिनिधी

जात पात धर्म न बाळगता वंचितांच्या सेवेचा आणि कल्याणाचा एक संकल्प घेऊन मी राजकारणात आलेले आहे, तुमचं दुःख हे माझं दुःख आहे, तुमच्या सर्व वेदना माझ्या पदरात टाका, तुम्हाला सर्व सुखं मिळावीत, यासाठी मी आयुष्यभर लढत राहील,नगद नारायणाने आशीर्वादरूपी एवढी शक्ती मला द्यावी अशा शब्दांत भाजपच्या राष्ट्रीय सचिव पंकजाताई मुंडे यांनी ग्रामस्थांशी संवाद साधला.

भाजपच्या गांव चलो अभियानांतर्गत पंकजाताई मुंडे यांनी रविवारी रात्री श्रीक्षेत्र नारायण गडाच्या पायथ्याशी असलेल्या पौंडूळ गावात जाऊन ग्रामस्थांशी हितगूज साधले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकारने गोरगरिबांच्या कल्याणासाठी राबविलेल्या विविध योजनांची माहिती देऊन 'फिर एक बार मोदी सरकार'चा नारा त्यांनी यावेळी दिला. याप्रसंगी ग्रामस्थांनी त्यांचं वाजत-गाजत मिरवणूक काढून जल्लोषात स्वागत केलं.

पुढे बोलतांना पंकजाताई म्हणाल्या, लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेबांवर तुम्ही खूप प्रेम केले, त्यांच्या जाण्याचं दुःख मुलगी

### गांव चलो अभियानांतर्गत पौंडूळ ग्रामस्थांशी साधला संवाद

#### गोरगरिबांसाठी विविध योजना राबवून पंतप्रधान मोदींनी देशात रामराज्य आणलं




म्हणून मला आहेच, पण तुम्हाला जास्त वेदना झाल्या, आजही तुमच्या डोळ्यात येणारे अश्रू त्यांची उणीव दाखवून देतात. साहेबांनी मला कधीही जातीपातीच राजकारण शिकवलं नाही, मी एकच जात मानते ती

(उर्वरीत पान २ वर)

### मोदींमुळे देशात 'रामराज्य'

नरेंद्र मोदी हे संघर्ष व गरिबीतून पुढे आलेलं नेतृत्व आहे. गरीबी जवळून पाहिल्याने त्यांना या वर्गाविषयी विशेष आस्था आहे, म्हणूनच गेल्या दहा वर्षांत गोरगरिबांच्या कल्याणासाठी त्यांनी वेगवेगळ्या योजना राबवून देशात रामराज्य आणलं. हे रामराज्य पुढच्या काळातही टिकावं यासाठी तुमच्या आशीर्वादाची गरज आहे. जिल्हयाचा सर्वांगिण विकास व्हावा यासाठी मी आणि खा.डॉ.प्रितमताई यांनी प्रामाणिक प्रयत्न केले. रेल्वे, रस्ते, महामार्ग आणले, प्रत्येक खेडे स्वयंपूर्ण केले असे त्या म्हणाल्या.

## १.४ लाख मोबाईल नंबर ब्लॉक, ३ लाख सिम बंद

### ५०० जणांना अटक, सरकारची कारवाई

मुंबई / प्रतिनिधी

केंद्र सरकारने डिजिटल फ्रॉडवर नियंत्रण ठेवण्यासाठी आतापर्यंत १.४ लाख मोबाईल नंबर ब्लॉक केले आहेत. हे मोबाईल नंबर आर्थिक फसवणुकीशी संबंधित होते. वित्तीय सेवा सचिव विवेक जोशी यांच्या अध्यक्षतेखाली आर्थिक सेवा क्षेत्रातील सायबर सुरक्षेबाबत बैठक झाली. एपीआय (एप्लिकेशन प्रोग्रामिंग इंटरफेस) इंटिग्रेशनद्वारे सिटीझन फायनान्शिअल सायबर फ्रॉड इन्फॉर्मेशन अँड मॅनेजमेंट सिस्टम प्लॅटफॉर्मवर बँका आणि आर्थिक संस्थांचा समावेश करण्याच्या विविध मुद्द्यांवर चर्चा करण्यात आली.निवेदनानुसार, सीएफसीएफआरएमएस प्लॅटफॉर्म नॅशनल सायबर क्राइम इन्फॉर्मेशन पोर्टल शी जोडला जाईल. यामुळे पोलीस, बँका आणि आर्थिक संस्था यांच्यात चांगला समन्वय साधता येईल.दूरसंचार विभागाने खूप एसएमएस पाठविणाऱ्या ३५ लाख प्राथमिक युनिट्सचे विश्लेषण केलं. यापैकी १९,७७६ एसएमएस पाठवण्यात गुंतलेल्या संस्थांना ब्लॅक लिस्टमध्ये टाकण्यात आलं आहे. या संदर्भात ५०० हून अधिक लोकांना अटक करण्यात आली असून अंदाजे ३.०८ लाख सिम ब्लॉक करण्यात आले आहेत. देशात सायबर फसवणुकीच्या घटनांमध्ये झपाट्याने वाढ झाली आहे, विशेषत: सायबर गुन्हेगार लोकांना कॉल करून फसवणूक करत आहेत.

### मैत्रेय प्रकरणी लोकाधिकार परिषदेच्या वतीने शासनाच्या विरोधात

## बांगड्या घाला आंदोलन

जालना / प्रतिनिधी

लोकाधिकार परिषदेच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज जयंती दिनी ,१९ फेब्रुवारी रोजी मैत्रेय प्रकरणी शासनाच्या दिरंगाईच्या विरोधात' बांगड्या भरा आंदोलन करण्यात येणार आहे, अशी माहिती लोकाधिकार परिषदेच्या महासचिव माया उके यांनी दिली.

मैत्रेय प्रकरण शासनाच्या गृहविभागाकडूनच निपटले जावू शकते.उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे राज्याचे गृहमंत्री आहेत.मैत्रेय गुंतवणूकदारांनी त्यांच्यासाठी काम करणाऱ्या संस्था, संघटनांनी आपसी मतभेद बाजूला ठेवून एकत्र आले पाहिजे.आगामी निवडणूकांअगोदरच मैत्रेय प्रकरण शासनावर दबाव आणून संपवले पाहिजे.ही शेवटची लढाई आहे.लोकसभा निवडणूक तोंडावर आली असून आपण हातावर हात ठेवून ,न्यायव्यवस्थेकडून न्याय मिळण्याची वाट बघत राहिलो तर पुढची पाच वर्षे लटकावे लागणार आहे.मैत्रेय प्रकरणात बैठका,मिटींगा घेवून नुसते फोटोसेशन करून काहीच हाती लागणार नाही.शासनाच्या विरोधात रस्त्यावर उतरून लढावे लागणार आहे.तेव्हाच पिडित गुंतवणूकदार लोकांना न्याय मिळेल.देशातील न्यायपालिका नाहिशी झाल्यासारखी आहे.म्हणून मैत्रेय प्रकरणी न्यायालयाकडून अजिबात न्याय मिळणार नाही. किसान आंदोलक, मराठा आंदोलकांनी शासनाविरूद्ध आक्रमक लढा देवून आंदोलनापुढे सरकारला झुकविले आहे.मैत्रेय परतावे मिळविण्यासाठी ज्या संस्था, संघटना अस्तित्वात आहेत त्यांनी लोकाधिकार परिषदेच्या लढ्यात सहभागी व्हावे आणि आंदोलन यशस्वी करावे असे आवाहन परिषदेचे अध्यक्ष किशोर गेडाम,महासचिव माया उके यांनी केले.

## दुबार शाळा अडचणीत येणार?

### 'नऊच्या ठोक्या'ची अंमलबजावणी कठीण

नागपूर । प्रतिनिधी

राज्यातील पूर्व प्राथमिक ते चौथीपर्यंतच्या वर्गांची शाळा सकाळी ९ वाजतानंतरच सुरू करण्याच्या राज्य शासनाच्या निर्णयामुळे दोन पाळ्यांमध्ये चालणाऱ्या शाळांना अडचणींना तोंड द्यावे लागणार आहे. उपलब्ध वर्गखोल्यांमध्ये सगळे वर्ग कसे भरवायचे आणि वेळेचे व्यवस्थापन कसे करायचे, असा प्रश्न या निर्णयामुळे शाळांना भेडसावणार आहे.

सर्व माध्यमांच्या आणि सर्व व्यवस्थापनांच्या पूर्व प्राथमिक ते चौथीपर्यंतच्या शाळा सकाळी ९ वाजतानंतर सुरू करण्याचा निर्णय आता राज्यात लागू होणार आहे. अनेक शाळांमध्ये पूर्व प्राथमिक आणि प्राथमिकचे वर्ग सकाळी भरतात तर माध्यमिक आणि उच्च माध्यमिकचे वर्ग दुपारच्या सत्रात घेण्यात येतात. यामुळे, उपलब्ध वर्गखोल्यांमध्ये सर्व वर्ग भरविणे शाळांना शक्य होते. आता नव्या वेळापत्रकामुळे या दोन्ही सत्रांतील वर्गांच्या वेळेचा संघर्ष होणार आहे. सकाळचे सत्र संपायच्या आधी



दुपारचे सत्र सुरू होणार आहे. एकाच वेळी इतक्या सगळ्या विद्यार्थ्यांना सामावून घेता येईल, इतक्या वर्गखोल्या अनेक शाळांकडे नाहीत. या अडचणीवर कसा मार्ग काढावा, याची चर्चा शाळांमध्ये सुरू झाली आहे. शाळांचे वेळापत्रक आणि सुविधा कशा सांभाळाव्यात, याचे व्यवस्थापन करावे लागणार आहे.

पहिली ते पाचवीचे काय?

राज्य शासनाने चौथीपर्यंतच्या वर्गांसाठी नवा निर्णय घेतला आहे. मात्र, नव्या शिक्षण आराखड्यानुसार अनेक शाळांमध्ये पाचवीचा वर्गही प्राथमिक शाळेला जोडला आहे.

## ऊस तोडणीसाठी कमी पैसे दिल्याने शेतकऱ्याचा ऊस जाळला

### शेतकऱ्यांचे मोठे नुकसान-लहामेवाडी येथील घटना

माजलगाव । प्रतिनिधी

तेलगाव येथील सोळंके सहकारी साखर कारखानाच्या ऊस तोड मजुराकडुनी शेतकऱ्यांनी कमी पैसे दिल्यामुळे शेतकऱ्याचा दोन एकर ऊस जाळला.यामुळे जो ऊस कारखान्याला जात आहे तो कमी भरू लागल्याने शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

माजलगाव तालुक्यातील लहामेवाडी येथील सर्व्हे नंबर ४१२ मध्ये गणपत संतोष आमनार यांनी ३ एकर ऊस लावला होता. ऊस लावण्यापूर्वी त्यांची तेलगाव येथील सुंदरराव सोळंके सहकारी साखर कारखान्यात नोंदणी केलेली होती. आता ऊस तोडणीला आला असून, साखर कारखाना ऊस घेऊन जाण्यासाठी टाळाटाळ करत असल्याचा आरोप शेतकऱ्याने केला आहे.त्याच बरोबर ऊसतोड मजुराने ऊस तोडणी साठी जास्त पैशाची मागणी केली होती. शेतकऱ्याने दोन एकर तोडणीसाठी केवळ आठ हजार रुपये दिल्यामुळे त्याचा ऊस ऊसतोड मजुरांनी जाळला. त्यानंतर हा ऊस तोडणीस सुरुवात केली यामुळे या शेतकऱ्याचा गेलेला कमी भरू लागल्यामुळे त्याचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे.




माझा ऊस चांगला असताना व मजुरांना आठ हजार रुपये देऊन देखील माझा जाळून कारखान्याला घेऊन जात आहेत. यामुळे हा ऊस वजनाला कमी भरू लागला आहे. यामुळे आमचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

-संतोष गणपत आमनार ,शेतकरी

सदरी शेतकऱ्याच्या उसामध्ये मोठ्या प्रमाणात ऐचन होती त्यामुळे हा ऊस जाळल्याशिवाय घेऊन जाणे शक्य नव्हते. त्यामुळे शेतकऱ्यांच्या परवान्याने हा ऊस जाळण्यात आला.

-बी.बी.चव्हाण ,शेतकी मदतनीस ,सोळंके साखर कारखाना

संपादकीय

# पाकिस्तानातील निवडणुकीचा अन्वयार्थ

आपला शेजारी देश पाकिस्तानात ८ फेब्रुवारीला निवडणुकीचे निकाल जाहीर झाले आणि अभूतपूर्व परिस्थिती निर्माण झाली आहे. पाकिस्तानात यंदा सर्वाधिक संख्येने माजी पंतप्रधान इम्रान खान यांच्या 'पाकिस्तान तेहरिक-ए-इन्साफ' या पक्षाने समर्थन दिलेले अनेक अपक्ष उमेदवार निवडून आले आहेत. इम्रान खान यांना निवडणुकीच्या राजकारणापासून दूर ठेवण्यासाठी नवाझ शरीफ यांचा 'पाकिस्तान मुस्लीम लीग' आणि 'पाकिस्तान पीपल्स पार्टी' या दोन पक्षांनी जंग जंग पछाडले. पण पाकिस्तानातील युवा मतदारांनी इम्रान यांच्या पक्षाला पसंती दिली आहे. त्यामुळेच पाकिस्तानात घटनात्मक पेचप्रसंग निर्माण झाला आहे. पाकिस्तान हा खूप लहान देश असला तरीही तेथे सारी सत्ता लष्कराची असते. त्यामुळे लष्कराला वाटेल तोच पंतप्रधान होतो. त्याला लष्कराच्या तालावर नाचावे लागते. इम्रान खानही त्याला अपवाद नव्हते. पण नवाझ शरीफ किंवा बिलावल भुत्तो या गणगांपेक्षा इम्रान खान तेथे आजही लोकप्रिय आहेत, याचेही प्रत्यंतर निवडणूक निकालांनी दाखवून दिले आहे.

इम्रान यांचा पक्ष म्हणजे 'पीटीआय'ने समर्थन दिलेल्या अपक्ष उमेदवारांमुळे पाकिस्तानातील पक्षीय राजकारणातील पारंपरिक गतिशीलतेला आव्हान दिले गेले आहे. तीव्र अशा स्वरूपाच्या राजकीय तिकडमबाजीला या निकालांनी तेज केले आहे. परिणामी पीपीपी आणि शरीफ यांचा पीएमएल एन या पक्षांनी आता औपचारिकपणे एकत्र येण्यासाठी बोलणी सुरू केली आहेत. त्यांच्यात पहिली औपचारिक बैठकही झाली. कोणत्याही परिस्थितीत इम्रान यांना आपल्याला आव्हान देण्याच्या स्थितीत राहू द्यायचे नाही, असा प्रयत्न या पक्षांनी केला आहे. त्यांची पोटदुखी ही आहे की इम्रान हे फार कर्तृत्ववान नसले तरीही युवा पिढीसाठी तेच सर्वाधिक लोकप्रिय नेते आहेत. त्यांना हर तऱ्हेने त्रास देण्याचा प्रयत्न या दोन्ही पक्षांनी केला. पण त्याला जनतेने धूप घातले नाही. पाकिस्तानातील निकालांनी राजकीय परिस्थितीत भूकंपीय बदलाचे संकेत दिले आहेत. हाच नाट्यपूर्ण आणि अचानक बदल झालेल्या संज्ञेचा अर्थ आहे.

देशाच्या इतिहासात प्रथमच इतक्या मोठ्या संख्येने अपक्ष निवडून आले आहेत. इम्रान यांच्या पक्षाला तर निवडणूक लढवण्याची परवानगी देण्यात आलेली नव्हती. त्यामुळे त्यांनी अपक्ष उभे केले होते. पाकिस्तानातील राजकीय आकांना वाटले की, इम्रान यांच्या पक्षाचे चिन्ह गोठवले आणि त्यांच्याकडे दुर्लक्ष केले, तर निवडणुकीचे निकाल बदलू शकतील. पण पाकिस्तानातील मतदारांनी शरीफ किंवा भुत्तो यांच्या संस्थानिक मानसिकतेत असलेल्या पक्षांना नाकारले आणि इम्रान यांना सर्वाधिक संख्येने आपले अपक्ष निवडून आणता आले. इम्रान हेही काही महान नेते नाहीत. पण इतर पक्षांनी त्यांना तुरुंगात टाकले आणि त्यांचे निवडणूक चिन्ह गोठवून त्यांच्यावर मात करता येईल, असा जो भ्रम बाळगला होता, त्याला मतदारांनी अस्मान दाखवले.

# लो.अण्णाभाऊ साठे वस्त्या मधील सुधारणा योजनेमधील कामातल भ्रष्टाचाराची चौकशी करा

## अधिकाऱ्यावर व कन्स्ट्रक्शन कंपनीला काळ्या यादीत समाविष्ट करावा – करण लोंढे

बीड ।प्रतिनिधी

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने कारवाई करा यासाठी जिल्हाधिकारी यांना निवेदन.वार्ड क्रमांक ३ मध्ये डॉक्टर कॉलनी या ठिकाणी नगर परिषद बीडच्या वतीने सन २०२२-२३ मध्ये करण्यात आलेले काम हे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे दलित वस्ती नागरिक सुधार योजना

अंतर्गत करण्यात आलेले आहे परंतु अनु जाती व नवबौद्ध यांची ५०% किंवा त्यापेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या अथवा अनु जातीसाठी राखीव असलेल्या प्रभागामध्येच करावीत असा आदेश असतानाही डॉक्टर कॉलनी या ठिकाणी अनु जाती व नवबौद्ध यांची संख्या १% टक्काही नाही तरीही त्या ठिकाणी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे दलित वस्ती नागरिक सुधार योजना अंतर्गत रस्त्याचे व नाली काम करण्यात आलेले आहेत करण्यात आलेली कामे दलित वस्ती नसलेल्या भागात करण्यात आली असून ही कामे बोगस आहेत. वार्ड क. ४ मधील कामे, वार्ड क. १८ मध्ये काम केलेले आहे. वास्तविक




वार्ड क्र. १८ मध्ये एकाही कामाची मंजुरी नसतांना वार्ड क. १८ मध्ये काम केल्याचे निदर्शनास आलेले आहे. अशा पध्दतीने अनेक ठिकाणची कामे शासनाच्या नियमानुसार नाही, वार्ड क्र. १८ मध्ये १) आकाश गायकवाड यांच्या घरापासून ते संतोष जाधव यांच्या घरापर्यंत, २) भाभी किराणा दुकाना पासून ते लक्ष्मण गुंजाळ (गांधीनगर) यांच्या घरापर्यंत ही कामें वार्ड क्र. ४ ची कामे आहेत. परंतु सदर कामे वार्ड क्र. १८ मध्ये वळवण्यात आलेली आहेत.

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे वस्त्या मधील सुधारणा योजनेमधील कामात झालेल्या भ्रष्टाचाराची उच्चस्तरीय चौकशी करून संबंधित अधिकाऱ्यावर योग्य कारवाई करावी व संबंधित कन्स्ट्रक्शन कंपनीला काळ्या पादीत समाविष्ट करण्यात यावे सदरील कामाची चौकशी न केल्यास दिनांक १६/०२/२०२४ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण कर्णचा इशारा मनसेच्या वतीने देण्यात आला आहे.

## निर्भय बनो अभियान प्रमुखावरील हल्ल्याच्या निषेधार्थ

# महात्मा गांधी स्मारकासमोर निर्भय बना सत्याग्रह आंदोलन:- डॉ.गणेश ढवळे



बीड ।प्रतिनिधी

पुणे येथील राष्ट्र सेवा दल आणि विविध संघटनांच्या वतीने आयोजित सानेगुरुजी स्मारक येथे लढा लोकशाहीचा अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा या कार्यक्रमाला जात असताना निर्भय बनो अभियान प्रमुख पत्रकार निखिल वागळे,विधिज्ञ असीम सरोदे यांच्या गाडीवर करण्यात आलेला हल्ला हा लोकशाहीवर आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्यावरील झुंडशाही आणि गुंडप्रवृत्तीच्या सत्ताधारी पक्षांच्या समर्थकांकडुन करण्यात आलेल्या हल्ल्याच्या निषेधार्थ ,

दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी या मागणीसह निर्भय बनो अभियानाला पाठिंबा देण्यासाठी आज दि.१२ सोमवार रोजी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली छत्रपती संभाजी महाराज क्रिडा संकुल येथील महात्मा गांधी यांच्या स्मारकासमोर निर्भय बना सत्याग्रहआंदोलन करण्यात येऊन जिल्हाधिकारी, पोलिस अधीक्षक बीड यांच्या मार्फत मुख्यमंत्री, प्रधान सचिव, गृहमंत्री यांना निवेदन देण्यात आले.यावेळी आंदोलनात शेख युनुस,सुदाम तांदळे,शेख मुबीन,शिवशर्मा शेलार, शेख मुस्ताक आदि सहभागी होते.

निर्भय बनो अभियानचे प्रमुख पत्रकार निखिल वागळे, सामाजिक कार्यकर्ते विश्वंभर चौधरी,विधिज्ञ असीम सरोदे यांनी राज्यभरात सुरू केलेले अभियान त्यांच्या भाषणातुन आणि समाज माध्यमांवर टाकत असलेल्या पोष्ट वरून भाजप विरोधी असल्याचा आरोप करत पुणे येथील राष्ट्र सेवा दलाच्या वतीने आयोजित विविध संघटनांमार्फत लढा लोकशाहीचा, अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा या विषयावर सानेगुरुजी स्मारक याठिकाणी आयोजित कार्यक्रमाला जात असताना पत्रकार निखिल वागळे,विधिज्ञ असीम सरोदे यांच्या गाडीवर सत्ताधारी भाजपा समर्थकांनी भ्याड हल्ला करत गाडीच्या काचा फोडत, शाईफेक,अंडी फेक करत दहशत माजविण्याचा प्रयत्न केला.सत्ताधारी पक्षाच्या कार्यकर्त्यांनी केलेला हल्ला लोकशाहीवर संविधानाने दिलेल्या अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर केलेला हल्ला असुन चिंताजनक असुन सत्तेच्या जोरावर झुंडशाही, गुंडागर्दी यामुळे लोकशाही धोक्यात आल्याचे लक्षण आहे.त्यामुळे संबंधित प्रकरणी दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी अशी मागणी करण्यात आली आहे.



जेष्ठ पत्रकार निखिल वागळे यांच्या वरील हल्ल्याचा

# पाटोदा पत्रकारांच्या वतीने निषेध आणि पोलिस प्रशासनाला निवेदन

पाटोदा ।प्रतिनिधी

पाटोदा पत्रकारांच्या वतीने ,मराठी पत्रकार परिषद,महाराष्ट्र राज्य पत्रकार पत्रकार संघ पाटोदा तालुका पत्रकार संघ,लोकशाही पत्रकार संघ मधील हल्ला विरोधी कृती समिती, डिजिटल मिडियाचे सर्व पदाधिकारी सदस्य पत्रकार यांच्या वतीने मुख्य विश्वस्त एस एम देशमुख, सर यांचे आदेशानुसार जेष्ठ पत्रकार विलास भोसले,कादर मकराणी, पोपट राऊत,विजय जोशी,माऊली जरांगे,इद्रीस चाऊस, श्रीरंग लांडगे,हमीदखान पठाण यांच्या उपस्थित पाटोदा पोलीसनिरीक्षक अनमोल केदार यांना निवेदनदेण्यातआले. पत्रकार निखिल वागळे यांच्या गाडीवर पुण्यात हल्ला करण्यात आला आहे..या झुंडशाहीच्या विरूध्द सर्वांनी व्यक्त झालं पाहिजे..या हल्ल्याचा निषेध व्यक्त करण्यासाठी व यातील दोषींवर कठोर कारवाई करावी या मागणीसाठी आज दि.१२ फेब्रुवारी रविवार रोजी दुपारी १.०० वाजता पाटोदा पोलिस स्टेशनमध्ये सहायक पोलिस निरीक्षक अनमोल यांना लेखी निवेदन देऊन जाहीर निषेध व्यक्त करण्यात आला यावेळी मराठी पत्रकार परिषद,महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ,पाटोदा तालुका पत्रकार संघ ,लोकशाही पत्रकार संघ पत्रकार हल्ला विरोधी कृती समिती पाटोदा तालुका निमंत्रक संजय सानप ,अजय जोशी, पत्रकार, अजिज शेख,विजय जाधव, भाऊसाहेब पवार,गणेश शेवाळे,बबन पवार,हरिदास शेलार ,अजय जोशी, इम्रान,जावेद शेख,प्रेस फोटोग्राफर राहुल सोनवणे, यांच्यासह इतर अनेक जण उपस्थित होते.



दिनांक ११/०२/२०२४ रविवार रोजी ११वाजता नगर परिषद सभागृह गेवराई येथे बैठक पार पडली महाराष्ट्र राज्य अधक्ष श्री अंकुश खोटे साहेब आणि बीड जिल्ह्यातील सर्व तालुका अध्यक्ष जिल्हा अध्यक्ष उपस्थित होते प्रथम सर्वांचा सत्कार करण्यात आला सर्वानी आपले मनोगत व्यक्त केलं नंतर माजी सैनिकांच्या आडी अडचणी समजून घेऊन त्याचे निराकरण केले आभार मानल्यानंतर सामुदायिक राष्ट्रगीत झाले त्याच बरोबर कार्यक्रमात कुमारी गौरी डोंगरे हिने सैनिकावर खूप छान गीत गायले तिचाही मान्यवराच्या हस्ते सत्कार करण्यात आला भारत माता की जय छत्रपती शिवाजी महाराज की जय झाल्यानंतर नाष्टा व चहा पाणी झाल्यानंतर बचत गटातील सदशना रोख १७०० रुपये बोनस देण्यात आल्यानंतर बैठक संपली आजच्या कार्यक्रमाचे सूत्र संचलन माजी सैनिक शेक रहीम साहेब यांनी केले.

# राष्ट्रसंत श्रेष्ठ भगवानबाबा व संतश्रेष्ठ वामनभाऊ महाराज पुण्यतिथी सोहळा संपन्न

अंबाजोगाई (बातमीदार)

स्वामी रामानंद तीर्थ मेडिकल परिसर येथे मागील दहा वर्षांपासून राष्ट्रसंत भगवानबाबा व संतश्रेष्ठ वामनभाऊ महाराज यांच्या पुण्यतिथी साजरी केली जाते. प्रति वर्षीप्रमाणे या वर्षी सुद्धापुण्यतिथी सोहळा आयोजित करण्यात आला होता. या सोहळ्यानिमित्त किर्तनकार श्री. ह.भ.प. बंडोपंत महाराज मुंडे श्रीक्षेत्र आळंदी (देवाची) यांचे सुश्राव्य किर्तनाचे आयोजन केले होते. याबाबत अधिक माहिती अशी की स्वामी रामानंद तीर्थ मेडिकल परिसर अंबाजोगाई येथे मागील दहा वर्षांपासून राष्ट्रसंत भगवानबाबा व संतश्रेष्ठ वामनभाऊ महाराज यांच्या पुण्यतिथी साजरी केली जाते.प्रति वर्षीप्रमाणे या वर्षी सुद्धापुण्यतिथी सोहळा आयोजित करण्यात आला होता.रविवार दि. ११ फेब्रुवारी रोजी सकाळी मान्यवरांच्या हस्ते प्रतिमा पूजन व दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवातझाली. श्री. ह.भ.प. बंडोपंत महाराज मुंडे श्रीक्षेत्र आळंदी (देवाची) यांचे सुश्राव्य किर्तन झाले. दुपारी १२ ते ०४महाप्रसाद भोजन देण्यात आले. यावेळी संत भगवान बाबा यांच्या महान कार्याला उजाळा देण्यात आला. संत तुकाराम महाराज यांच्या 'पवित्र सोवळी,तिच एक भुमंडळी,ज्याचा आवडता देव,अखंडित प्रेमभाव,तिच भाग्यवंत सरती पुरती धनवित्ते,तुका म्हणे देवा त्यांची केली पावे सेवा,या चार चरणांच्या आधारे श्री. ह.भ.प. बंडोपंत महाराज मुंडे श्रीक्षेत्र आळंदी (देवाची) यांनी कीर्तन केले. संत भगवान बाबा हे ऐश्वर्य संपन्न होते. बहुजनांच्या उद्धारासाठी सतत प्रयत्नात होते. मानवांनी आपल्या दैनंदिन कामासोबत मनशांतीसाठी भगवंताचे नामस्मरण करणे



आवश्यक आसल्याची शिकवण संतांनी दिली. संत भगवान बाबा यांनी शिक्षणा सोबतच शेती,व्यवसाय लक्ष केंद्रित करणे काळाची गरज असल्याचे आपल्या ग्रंथामध्ये विषद केलेले आहे .तेव्हा संत तुकाराम महाराज यांच्या वरील अभंगाच्या आधारे हरिकीर्तन संपन्न झाले. यावेळी माजी आमदार संजय दौंड, अक्षय मुंदडा, डॉ. धपाटे, डॉ.नितीन चाटे,डॉ. राकेश जाधव,माजी नगरसेवक संतोष शिनगारे आदी मान्यवरासह शेकडो समाज बांधवांची कार्यक्रमाला उपस्थिती होती. हा कार्यक्रम यशस्वी पार पाडण्यासाठी नितीन मोराळे, गणेश तांदळे,अंकुश गित्ते, प्रशांत खेडकर,बाबासाहेब सानप, राहुल तांदळे, सुमंत केदार,राहुल राख, दशरथ घुले, श्रीराम जायभाये, सचिन नागरगोजे, सतीश सानप, बाबा गित्ते,राम फड गणेश आगे,सोमनाथ सोनवणे अशोक मोराळे,पंकज वाघमारे,कृष्णा शिंदे,प्रवीण जरागे,सुधाकर सोनवणे, प्रशांत पुराणवाढ,रवि घोळवे,विष्णु केंद्रे,दत्ता सानप, संदिपसानप, सह आदिनी मेहनत घेतली. शेकडो समाज बांधवांची कार्यक्रमाला उपस्थिती होती.

## शेवटच्या रुग्णापर्यंत रुग्णसेवा...!

# बाजीराव चव्हाण याच्या कार्यालय माध्यमातून जानेवारी महिन्यात ३० रुग्णांना २३ लाख रुपयांची मदत

मा. बाजिराव दादा चव्हाण साहेब (धर्मवीर प्रतिष्ठान संस्थापक अध्यक्ष, महारष्ट्र राज्य)

रुग्णसेवेसाठी जात - पात - धर्म - पंथ - पक्ष विसरून सदैव गरजू रुग्णांच्या मदतीसाठी सदैव तत्पर.... शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष येथील एका माहीन्यात कार्यालयातून सुरू झालेला रुग्णसेवेचा हा प्रवास आता महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात पोहोचला आहे, बहुतांश जिल्ह्यात रुग्णसेवेची कार्यालयेही सुरू झाली आहेत. राज्यभरातून स्वयंसेवक या महायज्ञात जोडले जात आहेत. बीड जिल्ह्यातील एका तरुण मित्राचा आलेला हा ीस म्हणजे आमच्या निस्वार्थ आणि संवेदनशील कामाची पोचपावतीच आहे. मोठ्या संख्येने रुग्णसेवेचा ही चळवळ आता ग्रामीण महाराष्ट्रात रुजत आहे. एक से भले दो, दो से भले चार हे तत्व मानणारा शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष आहे. या कक्षाच्या माध्यमातून शेवटच्या रुग्णापर्यंत रुग्णसेवा पोहचविण्याच काम बाजीराव चव्हाण करत आहेत.आप्पासाहेब संभाजी येवले आजार रिप्लेसमेंट मदत १००००० लाख रुपये २) संजय इम्तियाज पिंजारी आजार नवजात बालक मदत ५०००० हजार रुपये ३) पाटिलबुवा हरिचंद्र समुद्रे आजार मेंदू रोग मदत ७५ ००० हजार रुपये ४) रामचंद्र कुंजीर आजार मेंदू रोग मदत १००००० लाख रुपये ५) श्रद्धा आदित्य काळुसे आजार नवजात बालक मदत ५०००० हजार रुपये ६) जानवी सूर्यकांत फरतडे आजार केमोथेरपी मदत १००००० लाख रुपये ७) गिरीश संतराम पाटील आजार किडनी प्रत्यारोपण मदत २००००० लाख रुपये ८) राजेंद्र विठ्ठल कारंडे आजार हिप रिप्लेसमेंट मदत १००००० लाख रुपये ९) अनंत अशोक माने आजार नवजात बालक मदत ५०००० हजार रुपये १०) संदीप काळे.आजार नवजात बालक मदत ५०००० रुपये ११) खयूम इस्माईल सय्यद आजार हिप रिपिलेस मदत १००००० लाख रुपये १२) अमोल शिंदे हजार नवजात बालक मदत ५०००० हजार रुपये १३) निकिता आत्माराम पवार आजार नवजात बालक मदत ४०००० हजार रुपये १४) विनय मनोज राठोड आजार अपघात मदत १००००० लाख रुपये १५) रशिदा इब्राहिम पठाण अजार नी रिप्लेसमेंट मदत ५०००० हजार रुपये १६) अनिताबाई श्रीराम कदम अजर मेंदू रोग आज मदत ५००० हजार १७) सीमा राजू शेख आजार नवजात बालक मदत ५०००० हजार रुपये १८) ऊतरेश्वरआत्माराम माने आजार हृदयरोग मदत १००००० लाख १९) सय्यद आफ्रिका नावेत आजार नवजत बालक मदत५०००० हजार रुपये २०)शत्रुघन गणेशराव होंडे आजार हृदयरोग मदत १०००००० लाख २१) वसंत गोपाजी राठोड आधार मेंदू रोग मदत १००००० लाख रुपये २२) लोटन भास्कर पाटील आजार कर्करोग मदत ५०००० हजार रुपये २३) शेख नोशीन मोशीन आजार नवजात बालक मदत ५०००० हजार रुपये २४) सय्यद सलीम शहा आजारा अपघात मदत १०००००० लाख रुपये २५) अब्दुल मजिद कुरेशी आजार नी रिप्लेसमेंट मदत ५०००० हजार रुपये २६) कोमल संदीप चक्रे आजार नवजात बालक मदत ५०००० हजार रुपये २७)(इ) शेख नोसिन मोसिन आजार नवजात बालक मदत ५०००० हजार २८) अबुक्कर शेख आजार अपघात मदत१००००० लाख रुपये२९) ऋषिकेश अभिमन्यू तांदळे आजार मेंदू रोग मदत १००००० लाख रुपये ३०) कृष्णा गोकुळ शिंदे आजार अपघात मदत १००००० लाख रुपये गोरगरीब रूग्णांच्या हक्काचे ठिकाण म्हणजे धर्मवीर प्रतिष्ठाणचे संस्थापक अध्यक्ष-: बाजीराव (दादा) चव्हाण यांनी चालु केलेले शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष बीड व धर्मवीर प्रतिष्ठान कार्यालय बीड गरजु रुग्णांनी अवश्य संपर्क साधावा



पत्ता-:रेणु हॉस्पिटल समोर, मुक्ताई बिल्डिंग,धांडे नगर, बार्शी रोड बीड

संर्पक क्रमांक -:९१४३७८७७७७/ ९१४३७१७७७७

# समाजातील गरजूंना कायम सहकार्य करत राहणार -आ.सुरेश धस

आष्टी ।प्रतींनिधी

भाजपतर्फे व्यापक जनसंपर्कासाठी राज्यात 'गाव चलो अभियान' सुरू आहे. याचाच भाग म्हणून आष्टी विधानसभा क्षेत्रामध्ये आ.सुरेश धस यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच त्यांच्या प्रमुख उपस्थितीत हे अभियान राबविले जात असून आ.धस हे गावा गावात जाऊन समाजातील विविध घटकांशी संवाद साधताना दिसत आहेत.त्यामुळे विचारांची देवाणघेवाण होत असल्याचे सांगत या अभियानाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असल्याची प्रतिक्रिया आ.धस यांनी माध्यमांशी बोलताना दिली.

रविवारी आ.सुरेश धस यांनी आष्टी शहरातील बूथ क्रमांक २०३ व २०४ मधील नागरिकांशी संवाद साधला.यावेळी सरकारी योजनेतील लाभार्थी कुटुंबीयांची आ.धस यांनी भेट घेतली.तर विधानसभा क्षेत्रात येणाऱ्या शाळा,पोस्ट ऑफिस, प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामपंचायत कार्यालय, अंगणवाडी, बचत गट, धार्मिक स्थळांना देखील भेटी दिल्या.नैपुण्य प्राप्त विद्यार्थी व खेळाडू, ज्येष्ठ कार्यकर्ते, नवमतदार, बूथ कमिटी, समाज क्षेत्रातील प्रभावशाली व्यक्तिमत्व अशा सर्वांची भेट घेऊन त्यांच्याशी संवाद साधला.तसेच तालुक्यातील गावागावात जाऊन त्या ठिकाणी विद्यालय, प्राथमिक आरोग्य केंद्र, अंगणवाडी, महिला बचत गट, ग्रामपंचायत कार्यालय यांना सदिच्छा भेट देत पाहणी

## गाव चलो अभियानाला उत्स्फूर्त प्रतिसाद



केली.यावेळी समाजातील महत्वाच्या गरजूंना कायम सहकार्य करत राहणार असल्याचेही आ.धस यावेळी म्हणाले.यावेळी नवमतदार, ज्येष्ठ कार्यकर्ते समाजातील प्रतिभावंत व्यक्ती तसेच खेळाडूंचीही त्यांनी भेट घेतली. गावात फिरून त्यांनी लोकांशी संवाद करत त्यांना मोदी सरकारच्या कार्याची माहिती दिली.यावेळी आष्टी मतदार संघाचे जनसंपर्क अभियान प्रमुख तसेच अल्पसंख्याक आघाडीचे सलीम जहांगीर विधानसभा विस्तारक हरीश खाडे याचयासह नगराध्यक्ष,उपनगराध्यक्ष,नगरसेवक तसेच शहरातील प्रमुख कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# संत रविदास महाराज जयंती कार्यकारिणी जाहीर

## अभिवादन साठी सेल्फी पॉईंट ची व्यवस्था - नानासाहेब घोडके




माजलगाव (बातमीदार)

संत रविदास महाराज जयंती निमित्ताने कार्यकारिणी जाहीर राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या वतीने संत रविदास महाराज जयंती संदर्भात बैठक नानासाहेब घोडके यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच रोजी शहरातील शासकीय विश्रामगृह येथे आयोजित करण्यात आली होती दरवर्षी प्रमाणे याही वर्षी महाराजांच्या जयंती संदर्भात चर्चा करण्यात आली कार्यकारणी खालील प्रमाणे आहे जयंतीचे अध्यक्ष योगेश शिंदे,उपाध्यक्ष राधाकिसन भाळशंकर, सचिन बबनराव नरहीर तर सल्लागार म्हणून सत्यनारायण ऊनवणे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आणि या बैठकीत जयंतीनिमित्त अभिवादन करण्यासाठी सेल्फी पॉइंट करण्याचे ठरले तसेच ३ मार्च रोजी वैष्णवी मंगलकार्यालय माजलगाव येथे जयंती साजरी करण्याचे ठरले या नंतर निवड झालेल्या मान्यवरांचे स्वागत करण्यात आले आणि सर्वांच्या वतीने माझा आणि सत्यनारायण ऊनवणे यांचा सत्कार करण्यात आला या बैठकीचे आयोजन राजेश जाधव आणि अशोक वाडेकर सर यांनी केले या बैठकीस चित्ते सर, अनिलराव खंडागळे, दिलीप सोनवणे, पद्माकर कांबळे, सुभाष कांबळे, श्रीमंत सोनवणे,आश्विन खंडागळे, विलास गवळी, अर्जुन पोहेकर, संतोष खंडागळे इ.उपस्थित होतेराष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या वतीने संत रविदास महाराज जयंती संदर्भात बैठक नानासाहेब घोडके यांच्या अध्यक्षतेखाली शासकीय विश्रामगृह माजलगाव येथे आयोजित करण्यात आली दरवर्षी साला बादा प्रमाणे याही वर्षी महाराजांच्या जयंती संदर्भात बैठकीत चर्चा करण्यात आली चर्चा अंती जयंतीचे अध्यक्ष योगेश शिंदे,उपाध्यक्ष राधाकिसन भाळशंकर, सचिन बबनराव नरहीर तर सल्लागार म्हणून सत्यनारायण ऊनवणे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली

या बैठकीत येत्या २४ फेब्रुवारीला संत रविदास महाराज यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करण्यासाठी सेल्फी पॉइंट करण्याचे ठरले तसेच ३ मार्च २०२४ रोजी वैष्णवी मंगलकार्यालय माजलगाव येथे जयंती साजरी करण्याचे ठरले या नंतर निवड झालेल्या मान्यवरांचे स्वागत करण्यात आले आणि सर्वांच्या वतीने माझा आणि सत्यनारायण ऊनवणे यांचा सत्कार करण्यात आला या बैठकीचे आयोजन राजेश जाधव आणि अशोक वाडेकर सर यांनी केले या बैठकीस चित्ते सर, अनिलराव खंडागळे, दिलीप सोनवणे, पद्माकर कांबळे, सुभाष कांबळे, श्रीमंत सोनवणे,आश्विन खंडागळे, संतोष खंडागळे इ. समाज बांधव उपस्थित होते

### प्रदेश काँग्रेस निवडणूक समितीत

# मातंग समाजाच्या प्रतिनिधींचा समावेश करावा - दत्ता कांबळे



माजलगाव ।प्रतींनिधी

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीची निवडणूक समिती नुकतीच जाहीर करण्यात आली आहे. ५२ सदस्यांच्या या निवडणूक समितीत मातंग समाजाचा एकही सदस्य नाही. या निवडणुक समितीत मातंग समाजाच्या प्रतिनिधींचा समावेश करण्यात यावा अशी मागणी मातंग समाजाचे नेते तथा काँग्रेस अनु जाती विभागाचे जिल्हाध्यक्ष दत्ता कांबळे यांनी काँग्रेसचे राष्ट्रीय सचिव के. सी. वेणुगोपाल यांना ईमेल द्वारे व प्रदेश प्रभारी रमेश चेन्नीथला यांना प्रतेक्ष निवेदनाद्वारे तसेच प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्याकडे दूरध्वनीद्वारे मागणी केली आहे.

काँग्रेस कार्यकारिणीच्या बैठकीसाठी रमेश चेन्नीथला तर अनुसुचित जाती विभागाच्या राष्ट्रीय कार्यकारिणीच्या बैठकीसाठी राजेश लिलोठीया मुंबईत आले असताना दत्ता कांबळे यांनी ही बाब वरिष्ठ नेत्यांच्या निदर्शनास आणून दिली व एक निवेदनही त्यांना सादर केले, रमेश चेन्नीथला, नाना पटोले व लिलोठीया या तिघाही वरिष्ठ नेत्यांनी दत्ता कांबळे यांच्या मागणीचा सकारात्मक विचार करण्याचे आश्वासन दिले आहे. अनुसुचित जातींमध्ये लोकसंख्येनुसार हा समाज दोन नंबरचा आहे. राज्यात मोठ्या प्रमाणात असलेला हा समाज सातत्याने काँग्रेस पक्षाच्या पाठीशी खंबीरपणे उभा असतो. तसेच मातंग समाजाला पक्षीय संघटनेत योग्य स्थान देऊन प्रदेश काँग्रेसच्या निवडणूक समिती मध्ये समाजातील ज्येष्ठ व अनुभवी नेत्यांचा समावेश करावा असे सदरील निवेदनात अनु जाती विभागाचे जिल्हाध्यक्ष दत्ता कांबळे यांनी म्हटले आहे .

# गरिबांचा वाली हरपला



परळी तालुक्यातील सुप्रसिद्ध असे डॉ. वाल्मीक मुंडे यांचे अपघाती दु:खद निधन

परळी ।प्रतींनिधी

परळी तालुक्यातील सुप्रसिद्ध, गरिबांचा वाली, डॉक्टर वाल्मीक मुंडे यांचे अपघाती दु:खद निधन ११ फेब्रुवारी २०२४ रविवार मध्यरात्री बारा ते साडेबाराच्या दरम्यान झाल्याचे समजते मृत्यू समयी त्यांचे वय अंदाजे ४८ होते ही बातमी जेव्हा परळी तालुक्यात वाऱ्यासारखी पसरली तेव्हा सर्वांना मोठा धक्का बसला, आणि कोणाचाही या गोष्टीवर विश्वास बसत नव्हता, ही घटना घडली नसेल खोटी बातमी असेल, पण खरोखरच घटना घडल्याचे मायबाप गोरगरीब जनतेसमोर आले तेव्हा त्यांच्या पायाखालची जमीन सरकली, गरिबांचा वाली हरपला, परळी शहरातच नाही तर परळी तालुक्यातील प्रत्येक गावात ते परिचित होते. अतिशय मित्त भाषा, मनमिळाऊ,नेहमी हसमुख चेहरा,गोड स्वभावाचे होते.

सविस्तर वृत्त असे की, ही घटना परळी तालुक्यातील बायपास रस्ता टोकवाडी ते जिरेवाडी या रस्त्यावर एक मोठा नाला असून या नाल्याचे काम चालू आहे, आणि याठिकाणी गुत्तेदाराने रस्त्याचे काम चालू असल्याचे फलक दोन्ही बाजूला दिसुत आले नाही.

# पुर्व उद्योग सेल तालुका ग्रामीण अध्यक्षपदी विजय शिंदे यांची निवड



संभाजी लांडे ।वडवणी

अखिल भारतीय मराठा महासंघाचे बीड जिल्हा मध्यवर्ती कार्यालय जालना रोड, बीड येथे पुढचं पाऊल पुस्तक शिवजयंती दिनी वितरण करण्यात येणार आहे. व मागील कामाचा आढावा बैठक पार पडली यावेळी अखिल भारतीय मराठा महासंघ बीड तालुका ग्रामीण पूर्व उद्योग सेल अध्यक्ष पदी विजय शिंदे यांची निवड करण्यात याली. यावेळी विजय शिंदे म्हणाले, की आपण या पदाचा माझ्यावर जबाबदारी दिली आहे. तर मि या पदाचा उपयोग कै: अण्णासाहेब पाटील यांचे विचार अखिल भारतीय मराठा महासंघाचे ध्येय तळागाळापर्यंत पोहोचण्यासाठी काम करत राहिल सुशिक्षित बेरोजगार विद्यार्थी तसेच उद्योग क्षेत्रामध्ये समाज बांधवांना मदत व जनजागृती करेल एवढे वचन देऊन मी मराठा महासंघाचे आभार व्यक्त करतो. विजय शिंदे यांना नियुक्तीचे पत्र मिळाल्याबद्दल सर्वस्तरातून अभिनंदन केले जात आहे. यावेळी मराठवाडा उपाध्यक्ष नारायण थोरात सर, जिल्हा अध्यक्ष बापूसाहेब साळुंखे यांच्या मार्गदर्शनाखाली निवड करण्यात आली. यावेळी उपस्थित बीड जिल्हा कार्याध्यक्ष आदिनाथ पिंगळे पाटील, बीड जिल्हा उपाध्यक्ष साईनाथ जगताप, बीड तालुका अध्यक्ष प्रकाश शिंदे, बीड शहरअध्यक्ष दत्ता शेळके, बीड जिल्हा सरचिटणीस भागवत बादाडे, बीड जिल्हा उपाध्यक्ष सुमंत खांडे सर सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

# सगे सोयरे या शब्दामुळेच मराठा समाजाला आरक्षणाचा लाभ मिळेल

गेल्या अनेक महिन्यापासून आपण बघतो आहोत की, महाराष्ट्रामध्ये मराठा आरक्षणाचे आंदोलन चालू आहे. २० जानेवारीला आंतरवाली सराटीतून येथून मा. मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वामध्ये मुंबईला निघालेला प्रचंड असा मोर्चा या ठिकाणी जवळपास अडीच ते तीन कोटी लोकांचा जनसमुदाय हा मुंबईकडे चालून जात होता, सरकार महाराष्ट्र सरकार आणि केंद्र सरकार पूर्णपणे आता बोला झाले होते काय करावं हे सरकारला कळत नव्हती आणि इतिहासामध्ये पहिल्यांदीच मुंबई पूर्णपणे बंद होईल की काय अशी शक्यता निर्माण झाली होती,मा. जरांगे पाटलांची एकच मागणी होती की परत जाईल तर आरक्षण घेऊनच, एकतर आरक्षण घेऊन विजयी गुलाल उधळून जाईल नसता माझी अंत्ययात्रा मुंबईतून परत आंतरपलीकडे जाईल ,अशा प्रकारची त्यांनी घोषणा करून टाकली होती परंतु यावेळी मा .मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री यांनी या ठिकाणी अतिशय कुशलतेने खास करून माननीय मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांनी हा सर्व प्रसंग हाताळून वाशी येथे सरकार आणि मनोज जरांगे पाटील यांच्यामध्ये काही मागण्या संदर्भात चर्चा झाली प्रशासनानं जरांगे पाटलांचे मुद्दे त्या ठिकाणी मसुद्याच्या स्वरूपात मान्य करून हे आंदोलन संपलं असं जाहीर जाहीर करून स्वतः मुख्यमंत्र्यांच्या हस्ते जरांगे पाटील यांनी उपोषण सोडून आंदोलनाची सांगता तिथेच झाली आणि विजय गुलाल उधळण्यात आला, सरकारला यामध्ये त्यामध्ये या मसुद्यामध्ये सगे सोयरे, विवाहातून तयार होणारे नातेसंबंध, आणि भावभावकी, हे तीन मुद्दे मसुद्यामध्ये मांडण्यात आले असून या तीन मुद्द्याच्या माध्यमातूनच मराठा समाजाला सरसकट आरक्षण मिळेल अशी आशा मा. मनोज जरांगे पाटील यांना आहे.भाव भावकी हा सुद्धा तसा जुनाच मुद्दा आहे, विवाहातून तयार होणारे नाते पितृसत्ताक पद्धतीने हा तसा पहिलाच मुद्दा पूर्वीपासून कायद्यान्वये या आपल्या राज्यांमध्ये देशांमध्ये आरक्षणाच्या लाभासाठी चालत आलेला आहे. मात्र सगे सोयरे हा शब्द या मसुद्यामध्ये मा. मनोज जरांगे पाटलांनी सरकारकडून टाकूनच घेतला आणि या शब्दामुळे आता मराठा आरक्षणाचा टिडा कायमचा संपेल अशी अभ्यासकांना आशा आहे ,घटनेच्या राज्यघटनेच्या कलम १६( ४) नुसार आरक्षणाची तरतूद आपल्या घटनेमध्ये आहे त्याचबरोबर १५ कलम(४) या यामुळे सामाजिक व शैक्षणिक मागासवर्ग यांना आरक्षण देण्याची तरतूद आपल्या घटनेमध्ये आहे अनुच्छेद ४६ अन्वये आर्थिक व शैक्षणिक दुर्बल घटकांची विशेष काळजी घेण्याचे राज्यघटनेमध्ये सांगण्यात आलेले आहे त्याचबरोबर जातीच्या नावाने भेदभाव करण्यास घटनेने पूर्णपणे मज्जाव केलेला आहे जात ही संकल्पना घटनात्मक आपल्या इथे नाहीच परंतु जातीच्या आधारे दिलेल्या आरक्षण मात्र घटनाबाह्य आहे ते मात्र आपल्या इथे परंपरेने चालू आहे!! असा आपणास दिसते, जातीला आरक्षण देणे किंवा एखाद्या जातीला आरक्षणच नाकारणे याचा निर्णय सर्वसाधारण त्या जातीच्या प्रथा परंपरा आणि या ठिकाणच्या धारणा सामाजिक मान्यता यानुसारच त्या जातींना आरक्षण दिलेल आपण पाहतो, तसं जातीच्या आधारावर आरक्षण देता येत नाही परंतु या ठिकाणी कुणबी, माळी, तेली, वाणी, आदिनां आरक्षण दिलं तर कसं याचाही उत्तर या ठिकाणी सापडत नाही? त्याचबरोबर राज्यघटनेमध्ये ओबीसी आदिवासी किंवा अस्पर्श ही कुठल्याही जातीची नावे नाहीत तर असे जे घटक आहेत जे आर्थिक आहेत मागासलेले आहेत असा एक समूह बनून त्यांना ही नाव दिलेली आहे ,असं आपल्या लक्षात येत पण आता १०२ व १०५ व्या घटना दुरुस्तीनंतर ओबीसी तथा इतर मागासवर्ग यांना नावाखाली दिलेल आरक्षण पूर्णपणे संपुष्टात आले आहे. म्हणून ओबीसी तथा इतर मागासवर्ग यांना आरक्षण देणे किंवा असलेले आरक्षण चालू ठेवणे हे घटना बाह्य आहे. करण्याचा त्याऐवजी अनुच्छेद ३६६ मध्ये अनुच्छेद ३४२ अन्वये निश्चित केलेल्या वर्गांना सामाजिक व शैक्षणिक मागासवर्ग असे म्हटलेले आहे आजपर्यंत न्यायालयाने जातीबाबतचे निर्णय घटनेतील तरतुदीच्या आधारे नव्हे तर त्या जातीचा असलेल्या परंपरा धारणा या ठिकाणच्या त्या जातींचा इतिहास व्यापक सामाजिक मान्यता या आधारे दिलेले आहेत ,तसं तर जात विरहित समाज निर्मिती हे आपल्या राजघटनेचे मुख्य उद्दिष्ट आहे. जातीचा निर्णय हा व्यक्ती कोण्या जातीचा आहे याचा निर्णय त्या जातीचा कुटुंब गण गोत आणि प्रथा परंपरा त्यांच्या धारणा याच्या आधारेच केला जातो . एकाच जातीतील विवाह हे त्या जातींचे जातीतील व्यक्तींचे टीसी दाखले बघून न करता आधीचे नातेसंबंध बघून केले जातात हे या ठिकाणी विशेषत्वाने लक्षात घ्यावे लागेल आता सोयरीक या शब्दाबद्दल सोयरीक दोन वेगवेगळ्या गणगोत मध्ये होत असते एकाच कुटुंबामध्ये सोयरी कधीच होत नाही. एकाच गणगोत सोयरीक जुळत नसते. सजातीय विवाह म्हणजे एकाच जातीतील मुलाचा आणि मुलीचा असलेला विवाह असे आपणास त्याची मान्यता आहे तो सुद्धा त्या सर्वसाधारण त्या जातींचे धारणा विवाह परंपरा प्रथा यांच्या सामाजिक मान्यतेच्या आधारेच आपणास करता येतो. ज्या दोन कुटुंबामध्ये सजातीय विवाह होतो त्यांना संगे सोयरे म्हणतात आणि म्हणून अशा सगळ्यांचे नातं विवाह या ठिकाणी प्रस्थापित होत असतात. त्यांची जात एकच असते हे मान्यतेने प्राप्त असतं आणि म्हणून या विषयाची घटनात्मक चर्चा करणं हे कदाचित चुकीचे सुद्धा होऊ शकते. आपण पाहतो की विदर्भातील कुणबी आणि मराठवाड्यातील मराठा यांचे परंपरेने विवाह या ठिकाणी शेकडो वर्षापासून झालेले आपणास पहावयास मिळतात विदर्भातील कुणबी ही एक जात मांनली आणि मराठवाड्यातील मराठा ही जर वेगळी जात मांनली तर मग यांच्यात विवाह शेकडो वर्षापासून कशाचे आधारे घडून येतात, तर त्यांच्या प्रथा परंपरा त्यांचे रीती रीवाज त्यांच्यामध्ये असलेला सारखेपणा साम्यता नातेवाईक संबंध या आधारे यांचे सगळे सोयरे पण एक दिसून येतात, आणि म्हणूनच याचा अर्थ असा आहे त्यांची जात सुद्धा एक आहे म्हणून म्हणून




म्हणून त्यांची जात एक तर कुणबी आहे, किंवा एक तर मराठा आहे . अशी वाटत असली तरी सगे सोयरे यांचे सर्व एक असल्यामुळे त्यांचे विवाह आजपर्यंत परंपरेने या ठिकाणी आपणास पहावयास मिळतात परंतु विदर्भातील कुणबी हे आरक्षणाचे पहिल्यापासूनच लाभधारक असल्यामुळे आणि त्यांच्यातील सगे सोयरे संबंधामुळे मराठवाड्यातील सुद्धा सर्व त्यांचे नातेगोते सगळे आरक्षणाचे लाभधारक निश्चितच बनू शकतात हे आपणास मान्यच करावं लागेल! मग भलेही त्यात पित्रसत्ताक मान्यता तर आधीच आहे परंतु मातृ सत्ताक सुद्धा सगळी सोयरे आणि नातेसंबंधांमध्ये कुठलीही अडचण न घेता मातृ सत्ता सुद्धा तेवढीच महत्त्वाची असल्यामुळे आणि सगे सोयऱ्यामुळे मातृ संस्थेकडून किंवा पितृ संस्थेकडून दोन्ही बाजूने धारणात्मक सामाजिक मान्यता प्राप्त नाते तयार होत असल्यामुळे आणि एकाच कुळातील एकाच गणगोत आतील नातेसंबंध तयार होत असल्यामुळे या सगे सोयऱ्या शब्दामुळे आरक्षणाचा तिढा निश्चितच सुटणार आहे म्हणून सरकारने याला मान्यता देऊन हा लवकरात लवकर प्रश्न निकाली काढला पाहिजे. नसता पुन्हा म्हणून मा. मनोज जरांगे पाटील यांनी आणखीन दहा तारखेपासून आमरण उपोषणाचा इशारा दिला असल्यामुळे पुन्हा एकदा महाराष्ट्रामध्ये आणखीन आंदोलनाची चळवळ मोठ्या प्रमाणामध्ये दिसून येईल यात निश्चितच शंका नाही, कारण हा मराठा आरक्षणाचा लढा आता गरजवंत, मराठा आरक्षणाच्या लढाईमध्ये परिवर्तन झालेला असून या लढाईमध्ये जो गरजवंत मराठा शेतकरी समाज आहे जो आर्थिक दृष्ट्या अतिशय दुर्बल झालेला असून, निरीक्षरतेच प्रमाण ,कौटुंबिक वाताहत वारंवार पडणारे दुष्काळ यामुळे हा समाज पीडित दुर्बल झालेला आहे . हा कुणबी मराठा समाज पहिल्यापासूनच मागासवर्गीय यांच्या यादीमध्ये प्रविष्ट असल्यामुळे आणि महाराष्ट्रातील काही प्रस्थापित राजकीय नेतेमंडळी आणि काही मुद्दामहून सामाजिक वातावरण बिघडणारे महाराष्ट्रातील सध्याचे काही मंत्री हे या मोठ्या संख्येने असणाऱ्या समाजाला अन्याय करण्याचा सध्या सुद्धा काम करत आहेत .या समाजामध्ये आता आरक्षणासाठीची मिळवण्यासाठीची क्रांतीची ज्योत मा. मनोज जरांगे पाटील यांनी पेटवलेली असल्यामुळे निश्चितच भविष्यामध्ये या संपूर्ण चळवळीला एक व्यापक यशाचं स्वरूपामध्ये ही चळवळ परिवर्तीत होईल अशी आशा निर्माण झालेली आहे. आणि या संपूर्ण चळवळीचे नेतृत्व निरपेक्ष असणारे मा. मनोज जरांगे पाटील हे करीत असून त्यांच्यामुळे या जनआंदोलनाला वेगळीच एक मोठी दिशा मिळालेली असल्यामुळे आता या सरकार समोर दुसरा पर्याय नाही ,तो म्हणजे सगे सोयरे हे शब्द मसुद्यातून अध्यादेशात परावर्तित करून कायद्याचे स्वरूपात आणून, एक नवा कायदा तयार होऊन , हा अध्यादेश लवकरात लवकर लागू करून अडचणीत असलेल्या आणि गेल्या ७० वर्षापासून अन्यायाच्या गर्तेत पडलेल्या या मराठा समाजाला या सगे सोयरे शब्दांमुळे निश्चितच न्याय मिळेल ही अपेक्षा संपूर्ण मराठा समाज संपूर्ण महाराष्ट्रातील जनतेला मा. मनोज जरांगे पाटलामुळे आता आशा लागलेली आहे. मागच्या सर्व आंदोलनाचा बोध घेऊन सरकार यातून लवकरच निर्णय घेऊन सर्व मराठा समाजाला न्याय देईल ही अपेक्षा.....

**डॉ. गोविंद मस्के वडवणी ( ९४२३१७०१९७ )**

# मराठवाडा पत्र

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे






## सगेसोयऱ्यांच्या अधीसुचनेचे तात्काळ कायद्यात रुपांतर करा !

केज ।प्रतींनिधी

मराठा योध्दा मनोज जरांगे पाटील यांचे अंतरवली येथे सुरू असलेल्या अमर उपोषणाची दखल घेऊन सगेसोयरेच्या अधीसुचनेचे कायद्यात रुपांतर करून अंमलबजावणी तात्काळ करावी अन्यथा मी रोहन गलांडे पाटील मनोज जरांगे पाटील यांच्या सर्मथनार्थ अमरण उपोषनाला बसनार असा इशारा रोहन गलांडे पाटील यांनी सरकारला निवेदनाद्वारे दिला आहे या विषयी सविस्तर वृत्त असे की मी रोहन गलांडे पाटील मु.पो.चिंचोली माळी ता.केज जि.बीड येथील असुन केज तहसीलदार साहेब यांना विनंती निवेदनाद्वारे करतो की मराठा योध्दा मनोज जरांगे पाटील यांचे अंतरवली येथे सुरू असलेल्या अमर उपोषणाची दखल घेऊन मराठा समाजाला आरक्षण देण्यासाठी राज्य सरकारने केलेल्या सगेसोयरेच्या अधीसुचनेचे कायद्यात रुपांतर करून त्या सगेसोयरेच्या अधीसुचनेचे कायद्यात रुपांतर करून अंमलबजावणी तात्काळ करावी अन्यथा मी रोहन गलांडे पाटील मनोज जरांगे पाटील यांच्या सर्मथनार्थ श्री संत नामदेव महाराज सभागृह चिंचोली माळी येथे १६ तारखे नंतर अमरण उपोषनाला बसनार आहे असा इशारा सरकारला देतो तरी राज्य सरकारने यांची गांभीर्याने दखल घेऊन मराठा समाजाला आरक्षण देण्यासाठी राज्य सरकारने जो सगेसोयरे कायदा केला आहे त्या सगेसोयरे कायद्याची अंमलबजावणी तात्काळ करावी अशी मागणी करतो निवेदनाद्वारे रोहन गलांडे पाटील यांनी केली आहे यावेळी उपस्थित जेष्ठ पत्रकार रामदास तपसे, पत्रकार वाजेद शेख, पत्रकार मुकबशीर शेख,दिंगाबर तपसे, सुधीर मुंडे या वेळी उपस्थित होते.


## जय शिवसंग्राम संघटनेच्या माध्यमातून गोरगरिबांना न्याय मिळवून देऊ ...रामहरी मेटे

### जय शिवसंग्राम संघटनेत जाहीर प्रवेश

बीड ।प्रतींनिधी

जय शिवसंग्राम संघटनेचे संस्थापक अध्यक्ष रामहरी मेटे यांच्या उपस्थितीमध्ये बीड शहरातील अनेक नागरिकांनी जय शिवसंग्राम या संघटनेत जाहिर प्रवेश केला . यामध्ये हिंदू -मुस्लिम महिला व नागरिकांचा समावेश आहे .याप्रसंगी सय्यद फारूक व इब्राहिम जहागीरदार यांची उपस्थिती होती .

बातमी सविस्तर : विद्यमान महाराष्ट्रातील राजकीय वातावरण ढवळून निघालेले आहे . यामध्ये कोणी कोणाचा पक्ष पळवला तर कोणी कोणाची संघटना ! आज महाराष्ट्रातील राजकीय घराणे पाहिले असता येथील सर्वच वातावरण गढूळ झालेले आहे . स्वतः चे अस्तित्व निर्माण करण्यासाठी भावाचा किंवा चुलत्याचा पक्ष पळवण्यापेक्षा स्वतःच अस्तित्व सिद्ध करणे केव्हाही चांगलेच ... या हेतूने यासाठी संघर्ष करावा लागतो , किंबहुना रस्त्यावर उतरावे लागते . रस्त्यावर उतरून गोरगरीब - वंचित - उपेक्षितांची लढाई लढावी लागते . छोटसं का होईना स्वतःच अस्तित्व निर्माण



करण्याची धमक फक्त काही लोकांतच असते ... यामध्ये बीडचा विचार केला असता रामहरी मेटे यांना मानावेच लागेल . बंधूच्या अपघाती मृत्यूनंतर पारिवारिक आरोप - प्रत्यारोप करत बसण्यापेक्षा किंवा इतरांनी आपल्याकडे बोट दाखवण्यापेक्षा स्वाभिमानाने जगलं पाहिजे . म्हणून भावाची संघटना माझी आहे हे सिद्ध करण्यासाठी वाद -विवाद करण्यापेक्षा स्व : कष्टान - स्वतःच अस्तित्व निर्माण करून जय शिवसंग्राम संघटनाचे छोटासे रोपटे लावले . काही काळानंतर नक्कीच वटवृक्षात रुपांतर होईल . तसेच याच दिशेने न खचता पाऊल टाकले या निर्णयाचे सर्व स्तरातून कौतुकच होत आहे . ही संघटना जोमाने कामाला लागली असून अनेक नागरिक पदाधिकारी लोक पाठिंबा देत आहेत . तसेच प्रत्यक्ष प्रवेश करत आहेत . याचाच एक भाग म्हणून बीड शहरातील महिला नागरिकांनी जयशिवसंग्राम संघटने मध्ये प्रवेश केला यामध्ये सर्वेसर्वा शेख असमा , शेख शयनाज शेख अब्दुल , नानाभाई रतन गुडेवार , विशा दिल्लीवाले, मदिना शब्बीर बेग, मिनाज रफिक पठाण , शेख सबा जुबेर , शेख मेहराज रहजाद , सय्यद रुकसाना इनुस, विमल चव्हाण दत्ता , भाग्यश्री मनोहर गुडेवार, मंगल मोरवाड, तसेच शेख यास्मिन शेख इजाज , शेख मेहमूद , गुलशाद शकील शेख, शेख आमीन , शेख रवीजशहा आदींनी रामहरी मेटे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून जय शिवसंग्राम संघटनेत प्रवेश केला . त्यांच्या पुढील कार्यासाठी मेटे परिवाराच्या वतीने शुभेच्छा देण्यात आल्या .याप्रसंगी सय्यद फारूक व इम्रान जहागीरदार हे उपस्थित होते.




## दुष्काळी उपाय योजना करा - अंधारे

बीड ।प्रतींनिधी

बँक ठेवीदारांच्या ठेवी मिळण्यासाठी शिवसेना उपनेत्या सुष्माताई अंधारे यांच्या नेतृत्त्वाखाली व माजी आमदार तथा लोकसभा प्रमुख सुनील दादा धांडे,बीड जिल्हा सहसंपर्कप्रमुख बाळासाहेब अंबुरे, शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर, जिल्हाप्रमुख गणेश भाऊ वरेकर, जिल्हाप्रमुख रत्नाकर आप्पा शिंदे, महिला आघाडीच्या जिल्हा संघटीका संगीताताई चव्हाण, युवासेना जिल्हा अधिकारी गजानन कदम, युवासेना जिल्हा अधिकारी रविराज बडे, शहर प्रमुख शेख निजाम भाई यांच्या प्रमुख उपस्थितीत,दुष्काळी परिस्थितीचे निवारण करणे व बँक मधील ठेवीदारांचे पैसे तात्काळ देण्यासंदर्भात जिल्हाधिकारी कार्यालयावर बीड जिल्हा शिवसेनेच्या वतीने भव्य मोर्चा काढण्यात आला.यावेळी उपजिल्हाप्रमुख आजिनाथ खेडकर, उपजिल्हाप्रमुख राजूभाऊ महूवाले, उपजिल्हाप्रमुख हनुमान जिजा जगताप, उपजिल्हाप्रमुख आशिष मस्के, जिल्हा संघटक रतन तात्या गुजर, जिल्हा संघटक नितीन भैय्या धांडे, महिला आघाडीच्या जिल्हा सह संघटीका फरजना भाभी,तालुका प्रमुख गोरख आण्णा शींघण, वडवणी तालुका प्रमुख विनायक बप्पा मुळे.

## केज विधानसभा मतदार संघातील विकास कामांसाठी जिल्हा नियोजन समितीतून २२ कोटींचा निधी मंजूर

### आ. नमिता मुंदडांच्या माध्यमातून मतदार संघाचा चौफेर विकास

**अंबाजोगाई - आ. नमिता मुंदडा यांच्या प्रयत्नांमुळे बीड जिल्हा नियोजन समितीच्या योजनेअंतर्गत जिल्हा वार्षिक योजना (२०२३-२४) मधून केज विधानसभा मतदारसंघातील विविध गावातील विकास कामांसाठी तब्बल २१ कोटी ५४ लाख रुपयांचा निधी उपलब्ध झाला आहे. यामुळे मतदार संघातील गावागावात विकासाची कामे मोठ्या प्रमाणात होणार असून विकासाला मोठी गती मिळणार आहे.**

केज विधानसभा मतदार संघाच्या आ. नमिता मुंदडा यांनी आमदारकीच्या पहिल्या टर्ममधेच कर्तुत्वाची चुणूक दाखवून दिली आहे. आ. मुंदडा यांच्या प्रयत्नांमुळे विविध माध्यमातून केज मतदार संघावर निधीचा अक्षरशः वर्षाव सुरु आहे. राज्यात महायुतीचे सरकार सत्तेवर आल्यापासून केज मतदारसंघातील गावागावात खेड्यापाड्यात शासनाच्या योजनेच्या माध्यमातून आ. नमिता अक्षय मुंदडा यांनी विविध विकासाची कामे मंजूर करण्यात आणि त्यासाठी लागणारा कोट्यावधी रुपयांचा निधी उपलब्ध करून घेण्यात मोठे यश आले आहे. आरोग्य, शिक्षण, कृषी, रस्ते, जल संधारण, पाणीपुरवठा, ऐतिहासिक स्मारके, देवस्थाने, स्मशानभूमी आदी सर्वच क्षेत्रात विकासकामे वेगाने सुरु आहेत. विशेष म्हणजे या सर्व कामांच्या दर्जावर स्वतः आ. मुंदडा वैयक्तिक लक्ष ठेऊन असल्यामुळे कामे गुणवत्तापूर्ण पद्धतीने होत आहेत. मागील वर्षभरात एक हजार कोटींपेक्षाही अधिक निधी मतदार संघातील विकास कामांसाठी मिळाला असला तरी निधीचा ओघ अजूनही सुरूच आहे. नुकतेच आ. मुंदडा यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे बीड जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत केज विधानसभा मतदारसंघातील विविध गावातील विकास कामांसाठी २१ कोटी ५४ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. यातून मतदार संघातील गावागावात मोठ्या प्रमाणात विकासकामे होणार आहेत. याबद्दल पालकमंत्री धनंजय मुंडे, भाजपच्या राष्ट्रीय सचिव पंकजाताई मुंडे आणि बीडच्या खासदार प्रितमताई मुंडे यांचे आ. नमिता मुंदडा यांनी आभार मानले आहेत.

जिल्हा वार्षिक योजनेतून केज मतदार संघात मंजूर कामे

☸ अंगणवाडी बांधकाम (७० लाख रु.) : सौदाना, बंदेवाडी, आरणगाव, एकुरका, आगेवाडी, काळवटी तांडा

☸ आरोग्य उपकेंद्र बांधकाम (४० लाख रू.) : साळेगाव येथे उपकेंद्र बांधकाम (४० लाख रू.)

☸ आरोग्य उपकेंद्र दुरूस्ती : येवता, जिवाचीवाडी, शिंदी, दहिफळ वड, कुंबेफळ, वाघेबाभुळगाव, सारणी, लाडेगाव येथील उपकेंद्रांची दुरूस्ती (प्रत्येकी १० लाख रू.)

☸ जि.प. शाळा खोली बांधकाम (१ कोटी रू) : चिंचोलीमाळी, सारूळ, कानडीमाळी, उमराई, दस्तगीरवाडी, मगरवाडी, हंगेवाडी, मुशर्दपुर, डोईफोडवाडी-२ (प्रत्येकी १० लाख रु.)

☸ पशु प्रथमोपचार केंद्र बांधकाम : होळ ता.केज येथे ३५ लाख रूपयांचा दवाखान्याचे बांधकाम करण्यात येणार आहे.

☸ जनसुविधा स्मशानभूमी बांधकाम : पळसखेड, नामेवाडी, जवळबन, धनेगाव, चिंचोलीमाळी, तांबवा, सांगवी, कानडीमाळी, लाडेगाव, धोत्रा, मुंडेवाडी, हनुमंत पिंपरी, मगरवाडी, डोंगरपिंपळा, पाटोदा, राजेवाडी, लोखंडी सावरगाव, भावठाना, पोत्रा, सोनपेठवाडी, देवगाव, बोरगाव, बावची, उंदरी, सौंदना, सुर्डी, देवळा, शेपवाडी, देवळा (प्रत्येकी ६ लाख रू.)

☸ तिर्थक्षेत्र विकास : श्रीक्षेत्र संत एकनाथ महाराज मठ संस्थान सासुरा सभामंडप (२५ लाख रू.), श्रीक्षेत्र हनुमान मंदिर आडस सभामंडप (२५ लाख रु.), श्रीक्षेत्र संत नामदेव महाराज मंदिर नेकनूर (९ लाख रू.), श्रीक्षेत्र मोहीनीराज मंदिर कळसंबर (८ लाख रु.), श्रीक्षेत्र तुळजाभवानी मंदिर पोत्रा (८ लाख रू.)

☸ जलसंधारण : माळेगाव - सिमेंट बंधारा (५० लाख रू.), साबला - सिमेंट बंधारा (५० लाख रू.)

☸ लघुपाट बंधारे जि.प. स्तर : धोत्रा, सारूळ, तांबवा, वाघेबाभुळगाव, कानडीमाळी, बोरिसावरगाव, नामेवाडी, मुलेगाव, डोंगरपिंपळा येथील तलाव दुरुस्तीसाठी ९० लाख रू.

☸ जि.प शाळा दुरूस्ती करिता ०१ कोटी निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे.

☸ अंबाजोगाई नगरपालिके अंतर्गत शहरातील विकासकामांसाठी ७ कोटी रु.

☸ केज मतदारसंघातील ग्रामीण भागातील रस्त्यांसाठी ३ कोटी.

☸ दलित वस्तीत (केज मतदारसंघ) विकास कामे करणे जि.प.स्तर - ३ कोटी रू.

## पाटोदा तालुक्यात पवन ऊर्जा मुळे होणार गॅगवार?



पाटोदा ।प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यात सध्या मोठ्या प्रमाणात पवन चक्की बसवण्याचे काम चालू आहे तर दासखेड.वैधकिन्ही.येथे पवन चक्की यंत्रना सामुग्री मोठा साठा व कामगारांसाठी राहण्यासाठी पत्रा खोल्या आहेत. या साठी स्थानिक लोक कामगार म्हणून काम करतात.व मेन कर्मचारी व अधिकारी हे युपी बिहारी.गुजरात येथील आहेत. सध्या पवन चक्की उभारणी काम चालू आहे या साठी ओ.टु पावर या कंपनी मार्फत काम चालू आहे या कंपनीने प्रत्येक गावात मैं थंग्या सारखें एजंट नेमले आहेत यांच्या हस्ते शेतकरी व कंपनी मधील करार करून घेतला जातो.शेतकरी यांच्या शेतात जर ऐक लाईट चा पोल गेलातर शेतकऱ्यांना दहा हजार रुपयेचा चेक दिला जातो. जसा शेतकरी तयार होईल तसा तयार करतात. कुणाला धमकी सुद्धा दिली जाते परंतु सध्या मोठ्या प्रमाणात बीड व जामखेड येथील गुंड प्रवृत्तीचे लोक येतात व अधिकारी व कर्मचारी यांना धमकी देतात पाच लाख रुपये द्या दहा लाख रुपये द्या आम्ही आमुन डॉनचए मानस आहेत तमुक आहेत जीव मारू . दोन तीन गाड्या घेऊन येतात सारं लोक मोठं मोठें डॉ असल्याचे भासवून पैसे उकळले चे प्रयत्न करतात कामगार हे जीव मुठीत धरून काम करतात कामगार शि विचारणा केली असता सर्व कामगार हे भैबीत अवस्थेत होते.कोणताही कामगार माहिती देण्यासाठी तयार नाही फक्त वेगवेगळ्या साहेबांचे नांवे सांगतात

## वाहन चालकांसाठी डोळ्याचे आरोग्य अत्यंत महत्त्वाचे डॉ. अशोक बडे

**बीड ।प्रतिनिधी**

**वाहन चालकांनी शरीराच्या आरोग्यासह डोळ्याच्या आरोग्याची ही काळजी घेतली पाहिजे वाहन चालवताना वाहन चालकांना वेळेवर झोप, जेवण या गोष्टीकडे लक्ष द्यायला वेळ मिळत नाही. किमान डोळ्यांची वेळोवेळी तपासणी करून त्याच्या आरोग्याची काळजी घ्यावी असे आवाहन जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अशोक बडे यांनी रस्ता सुरक्षा अभियानांतर्गत वाहन चालकांच्या नेत्र तपासणी शिबिरात बोलताना केले.**

जिल्हा रुग्णालयात झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर,तर प्रमुख पाहुणे म्हणुन नेत्र विभाग प्रमुख डॉ.चंद्रकांत वाघ, डॉ.आर आर जाजू ,वाहतुक शाखेचे प्रभारी ए.पी.आय.सुभाष सानप,या शिबिराचे उद्घाटक रोटरी क्लब मिड टाऊनचे अध्यक्ष संजय गुप्ता,सचिव सुरेश बुद्धदेव,कोशाध्यक्ष सर्वदन्य जोशी ,पत्रकार परिषदेचे जिल्हाध्यक्ष विशाल साळुंके, ज्येष्ठ पत्रकार नारायण नागरे,सिटी केबलचे पारस पोरवाल,ट्रक चालक-मालक संघटना अध्यक्ष विजय नाना काकडे,सामाजिक कार्यकर्ते तथा जिल्हा रुग्णालयाचे अशासकीय सदस्य डॉ.संजय तांदळे ,जिल्हा मोटर डाविंग स्कुलचे अध्यक्ष शहादेव वंजारे ,जिनीयस ऑटो संघटनेचे अध्यक्ष बाबुभाई, सचिव गणेश ढोले आदींची उपस्थिती होती . यावेळी अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांनी वाहतुकीच्या नियमाबद्दल सविस्तर माहिती दिली .वाहतुकीचे नियम पाळले तर बहुतांश अपघात कमी होतील असे त्यांनी यावेळी सांगितले. आपल्या आरोग्यासोबतच वाहतुकीचे नियमही पाळा असे आवाहन पांडकर यांनी केले. यावेळी डॉ.आर.आर.जाजू यांनी डोळ्याच्या आरोग्याशी असलेला संबंध आणि त्याचा मेंदूशी असलेला संबंध यावर सविस्तर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक पोलीस. उप .नि. विजय जाधवर यांनी तर आभार स.पो.उप.नि.वसुदेव मिसाळ यांनी मानले .यावेळी वाहन चालक -मालक संघटनेचे सदस्य,जिनीयस ऑटो संघटनेचे सदस्य, रोटरी क्लबचे सदस्य ,पत्रकार ,कर्मचारी,वाहतुक शाखेचे कर्मचारी , आरोग्य विभागाचे कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## बहुभाषिक साप्ताहिक संपादक, पत्रकार संघाची कार्यकारिणी जाहीर



### प्रदेशाध्यक्षपदी शेख ताहेर, उपाध्यक्षपदी सुनिल पोपळे यांची निवड

बीड (प्रतिनिधी)

साप्ताहिकांच्या संपादक, पत्रकारांच्या हितासाठी व त्यांचे प्रश्न शासन दरबारी मांडण्यासाठी बहुभाषिक साप्ताहिक संपादक, पत्रकार संघाची स्थापना करण्यात आली. साप्ताहिक वर्तमानपत्रे चालवितांना येणार्या अडचणींचा सामना करण्यासाठी व भविष्यातील साप्ताहिकांपुढील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी या पत्रकार संघाची स्थापना करण्यात आली. त्यानुसार पत्रकार संघाची पहिली बैठक काल दि.११ फेब्रुवारी रोजी मुख्य कार्यालय धोंडीपुरा, बीड येथे संपन्न झाली. या बैठकीत प्रदेश कार्यकारिणी निवडण्यात आली. यामध्ये प्रदेशाध्यक्षपदी सा.लोकमित्रचे संपादक शेख ताहेर जाफर यांची सर्वानुमते निवड करण्यात आली तर प्रदेशउपाध्यक्षपदी सा.प्रकाश आधारचे संपादक सुनिल ज्ञानोबा पोपळे यांची निवड करण्यात आली. यावेळी मराठवाडा उपाध्यक्षपदी सा.पोलखोलचे संपादक नितेश राजमल उपाध्ये, सा.रायमोहा परिसरचे संपादक राम काशिद यांची एकमताने निवड करण्यात आली. तर सा.गेवराई संघर्षयोध्दाचे संपादक अमोल कापसे यांची बीड जिल्हाध्यक्षपदी एकमताने निवड करण्यात आली. यावेळी बोलतांना शेख ताहेर म्हणाले की, आजच्या डिजीटल युगात लोकशाहीचा चौथा स्तंभाला तग धरणे अवघड झाले आहे. यातही साप्ताहिक चालविणे सुध्दा आज जिकरीचे काम झाले आहे. रोज नवनवीन आव्हाने असतांना साप्ताहिकांना आपले अस्तित्व टिकविण्यासाठी प्रचंड धावपळ करावी लागत आहेत. यामध्ये शासकीय स्तरावर काही अडचणी निर्माण होत असतील त्यांना पुर्ण सहकार्य करू असे आश्वासन दिले. तर शासन दरबारी साप्ताहिकांच्या प्रश्नांना वाचा फोडू असे प्रतिपादन सुनिल पोपळे यांनी केले. सदरील पदाधिकार्यांच्या निवडीबद्दल सर्वच स्तरांतुन अभिनंदन होत आहे तर अनेकांनी पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी सा.लोकनाथचे संपादक शेख अब्दुल रहेमान यांनी आभार मानुन बैठकीची सांगता झाली.

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि.बीड, -४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता.जि.बीड -४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे,

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed, Beed -431122 (Maharashtra).
Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq-Beed Dist-Beed pin -431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail-dailymarathwadapatra2021@gmail.com,
epaper : https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com